विमुक्त जाती भटक्या जमाती,इतर मागास वर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभागाचे नाव "इतर मागासवर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग" असे करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

विमुक्त जाती भटक्या जमाती,इतर मागास वर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग

शासन निर्णय,क्रमांक-संकीर्ण-२०१६/प्र.क्र.९५/आस्थापना

मादाम कामा रोड,हुतात्मा राजगुरु चौक,मंत्रालय,मुंबई-३२

दिनांक - २४ जुलै, २०१९

<u>वाचा</u> - १) शासन अधिसूचना,सामान्य प्रशासन विभाग,दि.९/३/२०१७

२) शासन निर्णय,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,क्रमांक आस्थाप्र-२०१७/प्र.क्र.२६४/आस्था-१,दि.२५/६/२०१९

<u>प्रस्तावना -</u>

दि.२७/१२/२०१६ रोजी मा.मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार विमुक्त जाती भटक्या जमाती,इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग हा स्वतंत्र विभाग स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. या बाबतची अधिसूचना सामान्य प्रशासन विभागाने दि.९/३/२०१७ रोजी राजपत्रात प्रसिध्द केली आहे. त्यानुसार या नवनिर्मित विभागाकडे पुढील १६ विषय सोपविण्यात आले आहेत.

१) विमुक्त जाती भटक्या जमाती,इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गाच्या कल्याणाकरिता प्रशासकीय यंत्रणा व महामंडळे,

२) विमुक्त जाती,भटक्या जमाती,इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गाच्या कल्याणकारी कामांसाठी समन्वय साधणे

३) इतर मागासवर्गासाठी केंद्र शासनाने मंजूर केलेली अनुदाने

४) विमुक्त जाती,भटक्या जमाती,इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गासाठी वसतिगृहे,

५) विमुक्त जाती,भटक्या जमाती,इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गाच्या आश्रमशाळा/उच्च माध्यमिक आश्रमशाळा,विद्यानिकेतन तसेच ऊस तोड कामगारांच्या मुलांसाठी आश्रमशाळा/निवासी शाळा संबंधित सर्व बाबी,

६) विमुक्त जाती,भटक्या जमाती,इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गासाठी सहकारी गृहनिर्माण योजना

७) विमुक्त जाती,भटक्या जमाती,इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गासाठी आंतरजातीय विवाह योजना

८) विमुक्त जाती,भटक्या जमाती,इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गासाठी केंद्र व राज्य शासनाची शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क, निर्वाह भत्ता, विद्यावेतन,व्यावसायिक प्रशिक्षण इ.योजना,

९) सामाजिक-आर्थिक सर्वेक्षणासह, सामाजिक कार्यासाठी प्रशिक्षण आणि संशोधन,

१०) सामाजिक कार्याचा समन्वय साधणे

११) विमुक्त जाती,भटक्या जमाती,इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गासाठी विविध कल्याणकारी योजना राबविणे, स्वयंसेवी संस्थांना/ अशासकीय संस्थांना आर्थिक सहाय्य व अनुदान देणे

१२) विमुक्त जाती,भटक्या जमाती,इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गाच्या व्यक्तींना/ संस्थांना/विद्यार्थ्यांना गुणवत्ता पुरस्कार प्रदान करणे

१३) विमुक्त जाती,भटक्या जमाती,इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभागाला नेमून दिलेल्या कोणत्याही विषयासंबंधातील हुकूमनाम्याची देय असलेली रक्कम निर्लेखित करणे

१४) या अनुसूचीतील कोणत्याही बाबींच्या प्रयोजनासाठी चौकशी व आकडेवारी,

१५) या सूचीतील कोणत्याही बाबींच्या संबंधात परंतु कोणत्याही न्यायालयात स्वीकारण्या न आलेली फी,

१६) राज्याच्या प्रयोजनासाठी शासनाकडे विहित केलेली किंवा शासनाच्या ताब्यात असलेली आणि विमुक्त जाती,भटक्या जमाती,इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभागाला नेमून दिलेली बांधकामे, जमिनी व इमारती.

त्यानंतर सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने दि.२५/६/२०१९ च्या शासन निर्णयान्वये खालील ६ विषय या विभागाकडे वर्ग केले आहेत.:-

१) मराठा आरक्षण
२) सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग कल्याण
३) राज्य मागासवर्ग आयोग
४) इतर मागास वर्ग,विमुक्त जाती,भटक्या जमाती,व विशेष मागास प्रवर्ग यांचे सूचीमध्ये एखादी जात समाविष्ट करणे
५) सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग,इतर मागास वर्ग,विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गाच्या जातविषयक सर्व बाबी
६) छत्रपती शाहू महाराज संशोधन,प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी)

या विभागास यापूर्वी नेमून दिलेले विषय आणि सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत वर्ग करण्यात आलेले विषय व योजना यांचे स्वरुप पाहता लोकसंख्येच्या प्रमाणात व आरक्षणाच्या प्रमाणात विभागाच्या नावामध्ये बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय –

याबाबत मा.मंत्रिमंडळाने दि. १६.७.२०१९ रोजी झालेल्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण या विभागाकडील योजनांचे स्वरुप पाहता या विभागाचे नाव संबंधित प्रवर्गाच्या आरक्षणाच्या टक्केवारीनुसार उतरत्या क्रमाने “**इतर मागासवर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग ” असे करण्यास मान्यता देण्यात येत आहे.**

२. या विभागाच्या नवीन नावाबाबतची अधिसूचना विधी व न्याय विभागाच्या सल्ल्याने सामान्य प्रशासन विभागाने प्रसिध्द करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०७२५११२२४२७६२२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

Bhaurao Raghunath Gavit

Digitally signed by Bhaurao Raghunath Gavit
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=VJNT OBCS SBC Welfare Dept., postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=692454783803b1bf08be0ff2505a01eb578c61edfbb827457be5704f5b440067, serialNumber=950bc6a64b0801087d4b403d7351619557bcd3489ca14b4e0f644bf05a04e89c, cn=Bhaurao Raghunath Gavit
Date: 2019.07.25 11:33:05 +05'30'

(भा. र. गावित)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपालांचे सचिव,मलबार हिल,मुंबई
२. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,मंत्रालय,मुंबई
३. मा.मंत्री,विमुक्त जाती भटक्या जमाती,इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण यांचे खाजगी सचिव
४. मा.राज्यमंत्री, विमुक्त जाती भटक्या जमाती,इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण यांचे खाजगी सचिव
५. मा.मुख्य सचिव यांचे सह सचिव,मंत्रालय,मुंबई
६. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव मंत्रालयीन सर्व विभाग
७. प्रधान सचिव, विमुक्त जाती भटक्या जमाती,इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण यांचे स्वीय सहाय्यक
८. संचालक, विमुक्त जाती भटक्या जमाती,इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण संचालनालय,पुणे
९. आयुक्त,समाजकल्याण,पुणे
१०. सर्व विभागीय आयुक्त,
११. सर्व जिल्हाधिकारी,
१२. सर्व कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,
१३. सर्व प्रादेशिक उपायुक्त
१४. सर्व सहाय्यक आयुक्त
१५. सह सचिव/उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी/नोंदणी शाखा प्रमुख, विमुक्त जाती भटक्या जमाती,इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग, मंत्रालय,मुंबई
१६. निवड नस्ती/आस्थापना